# जाहिरात सन 2019-2020

**विषय** –महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागांतर्गत बांधकाम व्यवस्थापन कक्षामध्ये अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ ,नाशिक व नागपुर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात उपअभियंता(स्थापत्य,विद्युत),कनिष्ठ अंभियंता (स्थापत्य,विद्युत) व स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेकरीता जाहिरात

आदिवासी विकास विभागांतर्गत बांधकाम व्यवस्थापन कक्षामध्ये अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ,नाशिक व नागपुर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील धुळे,ठाणे,अमरावती व चंद्रपुर विभागीय कार्यालयांतर्गत विविध उपविभागीय कार्यालयात निम्नदर्शित उपअभियंता(स्थापत्य,विद्युत),कनिष्ठ अभियंता (स्थापत्य,विद्युत) आणि स्थापत्य आभियांत्रकी सहाय्यक संवर्गातील पदे करार पध्दतीने भरणेसाठी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन Google Form मध्ये https://forms.gle/VjzC1PDqCFE2HRWp9 लिंक वर दिंनाक 30.08.2019 ते दिंनाक 05.09.2019 रोजी पर्यंत मागविण्यात येत आहेत.या मुदतीनंतर कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

पायाभूत सुविधा निर्मितीसाठी मुख्य अभियंता,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई अंतर्गत अधिक्षक अभियंता,सा.बां.(आ) मंडळ,नाशिक व नागपुर येथील आदिवासी क्षेत्राकरीता करार पध्दतीने उपअभियंता(सिव्हील,विद्युत),कनिष्ठ अभियंता आणि स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक यांची रिक्त पदे भरावयाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **करार पध्दतीने भरावयाची पदसंख्या** |
|---|---|---|
| 1 | उपअंभियता (स्थापत्य) | 03 |
| 2 | उपअंभियता (विद्युत) | 01 |
| 3 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 45 |
| 4 | कनिष्ठ अभियंता(विद्युत) | 16 |
| 5 | स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक | 57 |
| एकुण | | 122 |

**अ) वरील पदासाठी शैक्षणिक अर्हता –**

1. वरील अ.क्र. 1 पदाकरीता आर्हता शासन मान्यताप्राप्त स्थापत्य आभियांत्रिकी पदव्युतर पदवी परिक्षेत किमान 60% गुण व 5 वर्षे कामाचा अनुभव आवश्यक
2. वरील अ.क्र. 2 पदाकरीता आर्हता शासन मान्यताप्राप्त विद्युत आभियांत्रिकी पदव्युतर पदवी परिक्षेत किमान 60% गुण व 5 वर्षे कामाचा अनुभव आवश्यक
3. वरील अ.क्र. 3 व 5 पदाकरीता आर्हता शासन मान्यताप्राप्त आभियांत्रिकी पदव्युतर पदवी किंवा पदवी परिक्षेत किमान 60% गुण
4. वरील अ.क्र. 4 पदाकरीता आर्हता शासन मान्यताप्राप्त विद्युतआभियांत्रिकी पदव्युतर पदवी किंवा पदवी परिक्षेत किमान 60% गुण

**ब) करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीबाबत अटी व शर्ती –**

1. करार पध्दतीने नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल.परंतू अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता दरवर्षी आवश्यकतेनुसार व मूल्यमापनानूसार नूतनीकरण करता येईल.

**ड) मासिक भत्ते-**

1. उक्त तरतूदीनुसार निश्चित मासिक पारिश्रमिक एकमुस्त रक्कम प्रवासभत्ता व सर्व भत्यांपोटीसह खालील प्रमाणे अनुज्ञेय असेल. उपअंभियता,सिव्हील व विद्युत रु.60,000/- ,कनिष्ठ अभियंता (स्थापत्य व विद्युत ) रु.40,000/- स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक रु.35,000/-
2. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
3. अधिकारी/कर्मचारी शारीरीक.मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

4. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम करण्याची जबाबदारी संबधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्रात रु.100/-चे नोदणीकृत स्टॅम्पपेपरवर नियुक्तीच्या वेळी देणे आवश्यक आहे.तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने व विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती,करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही,यांचा समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्यअसल्याचा उल्लेख करारात करण्यात यांवा.

5. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याहीवेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा नियुक्ती समाप्त करण्याचा अधिकार राहतील.

6. अधिकारी/कर्मचारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

7. अधिकारी/कर्मचारी यांनी Conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

8. करार पध्दतीवरील अधीकारी/कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

9. वरील पैकी एकाही अंटीची पुर्तता होत नसल्यास अर्जदार यांचा अर्ज अपात्र ठरेल.तसेच ज्यांचे अर्ज अपात्र ठरतील त्यांना याबाबत काहीही कळविले जाणार नाही तसेच कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.यांची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

10. नियुक्ती देण्यात आलेल्या उपअभियंता ( सिव्हील व विद्युत ),कनिष्ठ अभियंता(स्थापत्य),स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक व कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांना आदिवासी व दुर्गम भागामध्ये स्थायी राहुन काम करणे अनिवार्य राहील.

**ई) अर्ज भरण्यासाठी आवश्यक सुचना-**

1. उक्त पदाकरीता सर्व अर्ज हे ऑनलाईन स्वरूपात स्विकारले जातील.ऑफलाईन / हस्तलिखित अर्ज ग्राहय व वैध राहणार नाहीत.

2. सदर पदाकरीता सविस्तर अटी शर्ती व **tribal.maharashtra.gov.in वर ताज्या बातम्या मध्ये व mahatribal.gov.in** मध्ये **अद्ययने/जाहिराती** या संकेतस्थळावरही उपलब्ध करणेत आलेला आहे.

3.उक्त पदाकरती अर्ज हे Google Form मध्ये https://forms.gle/VjzC1PDqCFE2HRWp9 या लिंकवर online अर्ज सादर करावा.व अर्जातील संपूर्ण माहिती भरल्यानंतर शेवटी सबमिट करणे आवश्यक राहील.

4. अर्ज सादर करण्यासाठी उमेदवाराना स्व:ताचा चालू Gmail ID मार्फत वरील लिंकवर आयडी पासवर्ड अद्यावत करून ऑनलाईन अर्ज उपल्बध होईल.

5. उमेदवाराना Google Form मध्ये Form भरण्यासाठी अडचणी आल्यास दुरध्वनी क्र.0253-2277410 या नंबरवर सकाळी 11 ते 1 व दुपारी 3 ते 5 या वेळेत तसेच Email Id:- poitdp.nsk-mh@gov.in या मेल आय.डी. सपंर्क करावा.

6. ऑनलाईन अर्जा मधील चिन्हाकीत सर्व बाबी पुर्ण भरणे आवश्यक राहील.तसेच अर्जात चालू फोन नंबर व ई मेल नोंदविणे आवश्यक राहील.

7. शासनाने सदर भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय,परिपत्रक,आदेश इ.लागु राहतील.

8. उमेदवाराचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्ज छाननी करून संबधीत उमेदवाराना माहे संप्टेबर 2019 च्या दुसऱ्या आठवडयात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

9. सदरचे भरती प्रक्रीयेत पदात फेरबदल तसेच भरती प्रक्रीया काही कारणास्तव स्थगित अथवा रद् करण्याचे अधिकारी नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे.

जा.क्र.आस्था/ 2019
अधीक्षक अभियंता,
सा.बां.(आदिवसी) मंडळ,नाशिक

**अधीक्षक अभियंता,**
**सा.बां.(आदिवासी) मंडळ ,नाशिक**